# पोलीस अधिक्षक,कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office,Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय, गडचिरोली
दिनांक ०६/०३/२०१९

## महिला दिनी 'बेबी मडावी आदीवासी महिला विकास साखळी' चे आयोजन

दिनांक ०८ मार्च २०१९ रोजी अंतराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधुन जिल्हा स्तरावर गडचिरोली येथे बेबी मडावी आदिवासी महिला विकास साखळी चे आयोजन गडचिरोली जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात आले आहे.

बेबी मडावी वय २५ वर्ष रा. इरपनार ता. भामरागड या आदिवासी तरुणीस तिच्या राहते घरातुन दिनांक २८/०९/२०१८ रोजी नक्षलवाद्यांनी बंदूकीचा धाक दाखवून त्यांच्या सोबत येण्यास भाग पाडले होते या नंतर दिनांक ०६/१०/२०१८ रोजी अत्यंत निदर्ययीपणे तिचा निघृण खुन नक्षलवाद्यांनी केला होता. बेबी मडावी ही आदिवासी समाजातील तरुणी अत्यंत हुशार व कष्टाळु होती. तिला आपल्या समाजाच्या विकासासाठी तसेच आपल्या कुटुंबासाठी कष्ट करुण आपले व आपल्या समाजाचे नाव मोठे करायचे होते. यासाठीच तिने पोलीस भरतीसाठी प्रयत्न केला होता. नक्षलवाद्यांना तिचा हा निर्धार पाहावला नाही व त्यामुळेच नक्षलवाद्यांनी तिचा अत्यंत निदर्ययीपणे खुन केला.

आंतरराष्ट्रीय महिला दिना निमित्ताने नक्षलवाद्यांनी केलेल्या या कृत्यांचा निषेध तसेच बेबी मडावी हिस श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी त्याचबरोबर बेबी मडावी प्रमाणे आदिवासी समाजातील इतर तरुणी आदिवासी समाजासाठी तसेच आपले स्वत: चे व आपल्या कुटुंबांचे नाव मोठे करण्यासाठी व अथक परिश्रम घेत आहेत व त्यांच्या आशा आकांक्षांना नवे बळ व पंख देण्यासाठी व त्यांच्या या ईच्छा आकांक्षामध्ये गडचिरोली पोलीस दल सदैव त्यांचा सोबत उभे राहणार आहे. यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात इंदिरा गांधी चौक गडचिरोली होणार असुन तरुणींची ही साखळी पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदाना पर्यंत असणार आहे. सदर कार्यक्रमाकरीता जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला व तरुणींनी सहभाग नोंदवून आदिवासी तरुणींचे मनोबल उंचवण्यास मदत करावी. असे आवाहन पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे सा़े. यांनी केले आहे.